# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण

जा.क्र.झोपुप्रा/उजि/कार्या-/झो.पु.क्षे.घो./ ८०
२०१५/दि.७/ ९/२०१६

परिपत्रक क्र. १७०

विषय :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणा मार्फत महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ कलम ३ क (१) अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणे बाबतची कार्यपध्दती.

संदर्भिय आदेशान्वये प्राधिकरणातील विविध विभागामध्ये सुरु असणाऱ्या कामकाजामध्ये सुसुत्रता आणणेचे अनुषंगाने कार्यआदेश पारीत करण्यात आले आहेत. त्यानुसार महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.,नि. व पु.) अधिनियम १९७१ चे कलम ३क (१) अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणे बाबतची नगर भूमापन विभागामार्फत करण्यात येत असलेली कार्यवाही ही उपजिल्हाधिकारी, झोपुप्रा यांचेकडे वर्ग करण्यात आली आहे. त्यानुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या उपरोक्त विषयासंदर्भातील परिपत्रक क्र.१४२ दि. ०८/०५/२०१३ रद्द करून खालील प्रमाणे नविन परिपत्रक निर्गमीत करणयात येत आहे.

प्राधिकरणाकडुन करण्यात येत असलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणे बाबतच्या कार्यवाही बाबत एकसुत्रता येण्या करीता पुढील प्रगाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

१) झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणे बाबत अ) जमिन मालक, ब) नियो. संस्थेचे मुख्य प्रवर्तक, क) संस्थेव्दारे निवडण्यात आलेले विकासक यांनी विहीत नमुन्यात सादर केलेला प्रस्ताव प्रथम उपजिल्हाधिकारी विभागाकडे नोंदविण्यात येतील.

२) उपजिल्हाधिकारी, स्थळपाहणी बाबतची कार्यवाही करतील. स्थळपाहणी मध्ये आवश्यक मुद्यांची खात्री करतील व स्थळपाहणी पंचनामा करतील. स्थल पाहणीचे आधारावर उपजिल्हाधिकारी विभागाव्दारे प्रस्तावात नमुद क्षेत्र झोपडपट्टी क्षेत्र घोषित करणे बाबत जमिन मालक / हितसंबधीत व्यक्तीच्या हरकती / आक्षेप प्राप्त करणे करीता जाहिर सुचना जनसंपर्क अधिकारी यांचे मार्फत वृत्तपत्रात तसेच प्राधिकरणाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

३) जाहिर सुचनेच्या अनुषंगाने हरकती / आक्षेप प्राप्त झाल्यास, त्याबाबत संबधीत उपजिल्हाधिकारी यांनी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा यांचे समक्ष सुनावणी आयोजित करतील.

४) सुनावणी अंती झालेल्या आदेशाचे अनुषंगाने पुढील कार्यवाही उपजिल्हाधिकारी विभागाव्दारे करण्यात येईल.

५) प्रकरणी कोणाही हितसंबधीतांच्या हरकती प्राप्त न झाल्यास, तसेच मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा यांनी प्रस्तावित क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणे बाबत आदेश दिल्यास उपजिल्हाधिकारी विभाग कार्यालयीन टिपणी सह अधिसुचनेचे प्रारुप तयार करतील. झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणे बाबतची कार्यालयीन टिपणी व अधिसुचना मा. सचिव, झोपुप्रा यांचे मार्फत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कडे अंतीम मंजूरी करीता पाठविण्यात येईल.

६) झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणे बाबतची अधिसुचना मराठी व इंग्रजी दैनिकात व राजपत्रात तसेच प्राधिकरणाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करणे बाबतची कार्यवाही जनसंपर्क अधिकारी, झोपुप्रा यांचे मार्फत करण्यात येईल.


प्रशासकीय इमारत, प्रो. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
दूरध्वनी : २६५६ ५८००, २६५९ ०४०५ / १८७९, फॅक्स : ०२२-२६५९ ०४५७, ई-मेल : info@sra.gov.in

७) झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणे बाबतची न्यायीक प्रकरणे विधी विभागा मार्फत हाताळण्यात येतील व त्यास उपजिल्हाधिकारी विभाग आवश्यक ते सहाय्य करेल. तसेच धारीकांचे संधारण उपजिल्हाधिकारी विभागाव्दारे करण्यात येईल.

८) झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित केल्यानंतर त्याची अधिसुचना व नकाशाची एक प्रत उपजिल्हाधिकारी विभागाकडे संधारणासाठी पाठविण्यात येईल.

९) संबंधीत धारीकेचे संधारण व जतन उपजिल्हाधिकारी/झोपुप्रा यांचे मार्फत करण्यात येईल. तसेच अधिसुचना व नकाशाची एक प्रत उपजिल्हाधिकारी विभागाकडे संधारणासाठी पाठविण्यात येईल.

१०) याबाबतची एक प्रत माहिती तंत्रज्ञान विभागाकडे पाठवून घोषित केलेल्या झोपडपट्टीच्या हद्दींचे GIS सर्वेक्षण करण्यात येईल व झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित केलेल्या आदेशाची प्रत प्राधिकरणाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण.

प्रत- १) मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा यांचे स्वीय सहाय्यक.
२) सचिव, झोपुप्रा यांचे स्विय सहाय्यक.
३) उपजिल्हाधिकारी/झोपुप्रा, शहर, पश्चिम उपनगरे, पूर्व उपनगरे